जैन समाजात प्रचंड खपाचे व लोकप्रिय मासिक

# जैन जागृति

(Since 1969) www.jainjagruti.in



६२ ऋतुराज सोसायटी, पुणे-सातारा रोड, भापकर पेट्रोल पंपा समोर, सिटी प्राईडच्या पुढची लेन, पुणे ४११०३७.

☎ : (०२०) २४२१५५८३

मोबाईल : संजय ९८२२०८६९९७, सुनंदा ९४२३५६२९९१

❖ संस्थापक ❖

**स्व. श्री. कांतीलालजी चोरडिया**

संपादक व प्रकाशक : संजय के. चोरडिया

संपादिका : सौ. सुनंदा एस. चोरडिया

❖ वर्ष ४९ वे ❖ अंक ४ था ❖ डिसेंबर २०१७ ❖ वीर संवत २५४४ ❖ विक्रम संवत २०७४

या अंकात

| | पान नं. |
|---|---|
| ● आनंद चरण तीर्थ, चिचोंडी | १४ |
| ● ।। जिनेश्वरी ।। अध्याय २०-महानिर्गंथीय | १५ |
| ● ऐसा रसिकलाल पुन्हा होने नाही | २१ |
| ● कव्हर तपशील | २५ |
| ● रसिकभाऊ धारीवाल - एक महामानव | ३१ |
| ● ऐसी हुई जब गुरुकृपा - एषणा री शुध्दि राख | ३३ |
| ● ''गुणवत्ता'' प्रचुरता से अधिक महत्वपूर्ण | ३७ |
| ● बातें काम की, ज्ञान की और जुबान की | ४० |
| ● अ.भा. समग्र जैन संप्रदाय तुलनात्मक तालिका २०१७ | ४१ |
| ● आदमी 'सोच' है (१) | ५१ |
| ● आनंद सुक्ति सुधा - प्रशम की शोभा समाधी योग १ | ६० |
| ● जैन कुटुंबातील विवाह जमवतांना | ६३ |
| ● कडवे प्रवचन | ६५ |
| ● मृत्यु को महोत्सव बनाएँ - समाधि मरण | ६५ |
| ● मराठी जैन साहित्य संमेलन, जयसिंगपूर | ७५ |
| ● हास्य जागृति | ८१ |
| ● डायलिसिस के साथ ध्यान साधना | ८३ |
| ● श्रीमद् राजचंद्रजी की १५० वी जन्मजयंती, धरमपूर | ८५ |
| ● राष्ट्रप्रमुखाचे गुण : जैनाचार्य सोमदेवाच्या दृष्टीने | ८८ |
| ● धर्माच्या कॉलम मध्ये जैन लिहा | ८९ |
| ● श्री. शांतीलालजी मुथ्था - राजीव गांधी मानवसेवा पुरस्कार | ९५ |
| ● वाचकांचे मनोगत | ९७ |
| ● जागृत विचार | ९७ |
| ● बालमुनी ७५० गाथा कंठस्थ सुनाई | १०० |
| ● श्री जैन संघ, पुणे - समाजहित के नियम चार घडों का उपक्रम | १०१ |
| ● मधुमेह जागरुकता अभियान, पुणे | १०२ |

- जैन धर्मावलम्बी गंग राजवंश १०४
- श्री हंसरत्न विजयजी म.सा. १२३ उपवास १०४
- पाचोरा ऐतिहासिक चातुर्मास १०५
- जैन झुणका भाकर केन्द्र, बार्शी १०७
- बात कडवी है, पर सच है १०९
- लोटस इव्हेन्टस्, पुणे – उद्‌घाटन ११५
- संचेती ट्रस्ट, पुणे – पुरस्कार वितरण ११६
- जैनीझम लघुपटाचे प्रकाशन, अहमदनगर ११७
- सौ. सुशिला मर्लेचा, पुणे – पुरस्कार ११९
- पेपरमिंट क्लोथिंग, पुणे – पुरस्कार १२३
- कटारिया फाऊंडेशन संमेलन, मोहनखेडा १२४
- धर्म का अर्थ है कषायों पर नियंत्रण १२५
- परिचय संमेलन – पुणे, मुंबई, औरंगाबाद १२८
- विविध धार्मिक व सामाजिक, राजकिय बातम्या


जैन जागृति मासिकाचे वर्गणी दर ❖ एका वर्षात तीन मोठ्या अंकासहित

| पंचवार्षिक | रु. २२०० | त्रिवार्षिक | रु. १३५० | वार्षिक | रु. ५०० रु. |
|---|---|---|---|---|---|

या अंकाची किंमत ५० रुपये.

- www.jainjagruti.in
- www.facebook.com/jainjagrutimagazine


# जैन जागृति मासिकाचे ग्राहक बना !

- वीतराग वाणी, आचार्य, साधू, साध्वी यांचे लेख, धार्मिक, सामाजिक व शैक्षणिक लेख, धार्मिक कथा, बोधकथा, ऐतिहासिक पुरुषांचे जीवन चरित्र, तीर्थक्षेत्र परिचय, समाज प्रबोधन लेखमाला, दीपावली पूजन विधी व मुहूर्त, आरोग्य व गृहोपयोगी लेख, विविध बातम्या इ. साहित्य जैन जागृतित प्रकाशित केले जाते.
- आपण स्वत: जैन जागृतिचे ग्राहक बना व आपले नातेवाईक, मित्र, व्यापारी बंधू इत्यादींना वर्गणीदार नसतील तर त्यांना वर्गणीदार होण्यास सांगा. • 'जैन जागृति' मासिकाची वर्गणी भरून इतरांना भेट पाठवा.

**सुसंस्कार व सदाचाराचा पुरस्कार करणाऱ्या 'जैन जागृति' मासिकाचे वर्गणीदार व्हा !**

## जैन जागृति – वर्गणीचे दर

| पंचवार्षिक | रु. २२०० | त्रिवार्षिक | रु. १३५० | वार्षिक | रु. ५०० |
|---|---|---|---|---|---|

वर्गणी व जाहिरात – रोख/मनिऑर्डर/ड्राफ्ट/AT PAR चेक/ पुणे चेकने / RTGS / SBI Online / Jain Jagruti Website इत्यादी द्वारा पाठवावी.

**JAIN JAGRUTI - BANK ACCOUNT DETAILS**

Bank : STATE BANK OF INDIA — Branch : Market Yard, Pune 37.

Current A/c No. : 10521020146 — IFS Code : SBIN0006117

## जैन जागृति मासिकात जाहिरात व वर्गणीसाठी संपर्क करा

फोन (०२०) २४२१५५८३ **मो. संजय:९८२२०८६९९७ सुनंदा:९४२३५६२९९१, www.jainjagruti.in**

**Email : jainjagruti1969@gmail.com ● Press Email : prakash.offset@rediffmail.com**

## ◆ जैन जागृतिचे प्रतिनिधी ◆

❖ **भोसरी, चिंचवड, निगडी** – श्री. चांदमलजी लुंकड – फोन : २७११९९४९, मो. ९९२१९११९४०९
❖ **पुणे शहर ❖ कुर्डुवाडी** – श्री. सुभाष मोहनलाल लुणिया, मो. ८७९३०००००८१
❖ **गुरूवार पेठ, पुणे** – श्री. जैन पुस्तक भंडार, फोन : २४४७२९५८
❖ **धनकवडी, पुणे** – श्री. सुरेंद्र हिरालालजी बोरा, मो. ७५८८९४३०१५
❖ **मार्केटयार्ड, पुणे** – श्री. प्रमोदकुमार शांतीलालजी छाजेड, मो. : ९८८१८७३७१०
❖ **महावीर प्रतिष्ठान, पुणे** – निलम रमेशचंद्र शहा, मो. ९०९६८००५४७
❖ **सदाशिव पेठ परिसर, पुणे** – सौ. स्वाती राजेंद्रजी कटारिया, मो. : ९८८१२०४३९०
❖ **वडगाव शेरी, पुणे** – सौ. भारती सुभाष नहार, मो. : ९८९०२७८३४६
❖ **वडगाव मावळ, पुणे** – श्री. राजेंद्र बाफना, मो. ९८२२२६२९०१
❖ **खडकी, पुणे** – श्री. विलास मुथा, मो. ९६२३१४८९८४
❖ **औंध, पाषाण, हिंजवडी, सांगवी, थेरगाव** – श्री. शिरिषकुमार शांतीलालजी डुंगरवाल, मो. ९०२११३००५५९
❖ **दापोडी, पुणे** – श्री. प्रवीण झुंबरलालजी चोरडिया, मो. ९९२२७५७७०६
❖ **नांदेड सिटी, पुणे** – श्री. प्रकाशजी हरकचंदजी बोथरा, मो. ९०११९८३६६६
❖ **दौंड, श्रीगोंदा** – श्री. रविंद्र चेनसुखलालजी गुगळे – ९८९०७२३४०२
❖ **अहमदनगर** – श्री. महेश एम. मुनोत– मो. ९४२०६३९२३०
❖ **जामखेड, आष्टी व कर्जत तालुका** – श्री. प्रफुल शांतीलालजी सोलंकी – मो. ९४०३६८५६७७, ८०८७७०००७०
❖ **सोनई** – श्री. मदनलालजी सी. भळगट – फोन : ०२४२७–२३१४६१, मो. ९८८१४१४२१७
❖ **औरंगाबाद** – श्री. सुभाषचंदजी मांडोत–फोन: (०२४०) २३५३४३८ मो.: ९४२२७०५९२१
❖ **मुंबई** खारघर– श्री. मदनलालजी गांधी–मो. ९८२०५३६७९३
❖ **नाशिक** – श्री. पुखराजजी बाबुलालजी जैन (कवाड) फोन:०२५३–२३११००८,मो.९४२३९३९९९०
❖ **नाशिक** – मनोज लखीचंदजी खिंवसरा, रविवार पेठ, नाशिक. मो. ९७६२२२१५०५
❖ **बीड** – श्री. अतुलकुमार शरदचंद्रजी कोटेचा, मो. ९९६००२४२२४
❖ **गारगोटी** (जि. कोल्हापूर) श्री. श्रीकांत राजाराम शहा, मो. ९८६०१०७७९२
❖ **श्रीरामपूर** –श्री. निलेश सुवालालजी हिरण, मो. : ९३२६९७२७४७
❖ **लासलगाव** – श्री. मनसुखजी साबद्रा, मो. : ७७७४९३८०३२
❖ **बारामती**– डॉ. महावीर छगनलालजी संचेती, फोन : ०२११२–२२३८०७ मो.:९३२५००४९५०
❖ **अमळनेर, जि. जळगाव** – श्री. मयुरकुमार केवलचंदजी जैन, मो. ९४२२६५७१७७
❖ **जळगाव** – श्री. अनील कुचेरिया, मो. : ९७६३६४५०५५
❖ **धुळे** – श्री. चेतन सतिष कोटेचा, सुभाषनगर, धुळे, मो. ९४०४१९२४३४, ९४२०६६१४२६
❖ **शहादा, जि. नंदुरबार** – श्री. मनोजकुमार विरचंदजी बाफना, मो. ९४२१५२९६२६
❖ **इचलकरंजी, जि. कोल्हापूर** – श्री. पोपटलालजी बिसनदासजी गुगळे, मो. ९८२२६५०९९८
❖ **मिरज, जि. सांगली** – श्री. राजेंद्र वसंतलाल शहा, मो. ९४२११०५७४८
❖ **कोल्हापूर** – सौ. लता कांतीलालजी ओसवाल, मो. ९४२३२८६०१४ फोन.०२३१–२६९५४३३
❖ **सातारा व सातारा जिल्हा** – श्री. जयकुमार कांतीलाल शहा, वाठार, मो. – ७५८८५६१३२०, ९८५०१८२६४४

तीर्थंकर प्रभु महावीरांचे अंतिम वचन, श्रीमद् उत्तराध्ययन सूत्रावर आधारीत

# ।। जिनेश्वरी ।।

**प्रवचनकार : उपाध्याय श्री प्रवीणऋषिजी म.सा.**

**भावानुवाद : साध्वी श्री ओजसदर्शनाजी म.सा., सौ. योगिता चंगेडे** *(क्रमशः)*

## अध्याय २० – महानिर्गंथीय

''मीच माझा सुखकर्ता
मीच माझा दुःखकर्ता
माझा आत्माच माझा शत्रु
माझा आत्माच माझा मित्र
मीच माझा प्रभू''

कोणाला म्हणायचे नाथ, स्वामी ? कशी असते अनाथता ? याची अनुभूती करवणारा हा अध्याय, तो ऐकल्याने, वाचल्याने जीवनातील सगळी लाचारी, दीनता, अनाथता निघून जाते आणि आपण स्वतःच स्वतःचे नाथ आहोत व आपल्याला संपुर्ण विश्वाचे नाथ बनुन जगायचे आहे, हे बळ मिळते.

एक मूढ व्यक्ति शहाणी झाली. भोगाला मान्यता देणारा संयमाला आमंत्रण देऊ लागला. आकंठभोगात बुडालेली व्यक्ति उत्कृष्ट योगी बनली. ज्याच्यामुळे राजा श्रेणिकची भगवंत बनण्याची निश्चिती पक्की झाली. अशी राणी चेलना, राजा श्रेणिकची धर्मावर श्रद्धा नव्हती. धर्ममार्गावर आस्था नव्हती. पती होता, पण तो धर्मापासून दूर होता, यामुळेच दुःखी होती राणी चेलना.

एकदा राजा–श्रेणिक त्याच्याच उद्यानात फिरायला गेला. तेथे लता–वेलींचा सुंदर नैसर्गिक मांडव होता. त्या मांडवाखाली एक तरूण योगी बसलेला होता. तो इतका रूपवान, एवढा तेजस्वी होता की राजा थक्क झाला. असे क्वचीतच घडते की पुरूषाला पुरूषाचे सौंदर्य भुरळ घालते. पुरूषाला स्त्रीचे रूप मोहीत करू शकते.

त्या योगीला पाहून राजा विचारात पडला. ''ओहो! काय रूप आहे, काय तेज आहे, किती हे सौंदर्य ?

ज्या रूपाने भोग भोगायला हवे होते ते रूप योगी का बनले ? ज्या रूपाची सौंदर्याची, तेजाची मला कामना होती त्या रूपाचा, सौंदर्याचा धनी मुनी कसा काय बनू शकतो ?''

राजाने पुढे जाऊन त्याला प्रणाम केला आणि प्रश्न विचारला, ''हे तरूण पुरूषा, तू इतका रूपसंपन्न असून भर यौवनात तू हा वृध्दांचा मार्ग का निवडलास.'' आपल्या दैनंदिन जीवनात अल्पवयीन साधु–योगी पाहून विचार येत असतो की आपण प्रौढ वृध्द सुध्दा या मार्गावर चालण्याची हिंमत करीत नाही आणि हे तरूण यौवनात या मार्गावर कसे चालण्याची हिंमत करतात?

नाथ कोण ? अनाथ कोण ?

श्रेणिकच्या प्रश्नाला उत्तर देत योगी म्हणाला ''हे राजन, माझे दुःख दूर करण्यास कोणी समर्थ नव्हते, माझा कोणी प्रभु नव्हता, म्हणून मी या पथाचा पथिक झालो.''

राजाला आश्चर्य वाटले ''शक्य नाही, तुझे रूप सांगते की तु किती संपन्न कुटुंबात आला आहेस. अरे! तू म्हणतोस तू अनाथ आहेस म्हणून तू संन्यास घेतला, पण असं होणं शक्य नाही तरी सुध्दा आता तू अनाथ नाहीस. आजपासून मी तुझा नाथ. चल ये, या जीवनाचा

आनंद घे, ऐश्वर्याचा उपभोग घे.''

योगी हसून म्हणाला, ''राजन् अनाथ कधी दुसऱ्याचा नाथ बनू शकत नाही. जो स्वत: दीन आहे तो दुसऱ्याचा दयासागर कसा बनु शकेल ?

राजा नखशिखान्त हादरला 'मी अनाथ कसं शक्य आहे ?' राजाला आश्चर्य वाटले कदाचित कारणवश हा योगी असत्य बोलत असावा राजा स्वत:च्या ऐश्वर्याचा परिचय देत म्हणाला ''योगी माझ्याकडे हत्ती आहे, सेना आहे, राणी वसा आहे माझी आज्ञा झेलणारे सेवक-दास आहेत. कामनापूर्तीचे वैभव आहे, सर्व सत्ता संपत्तीचा मालक अनाथ कसा ? तुझे वक्तव्य असत्य आहे.''

योगी म्हणाला, ''राजन् तुला हेही माहीत नाही की, अनाथ कोणाला म्हणतात ? तू कसा काय कोणाचा नाथ बनू शकशील ?'' राजाला आश्चर्य वाटत होते तरीही तो शांतपणे म्हणाला, ''योगी, कदाचित असे होऊ शकते की मी ज्याला नाथ म्हणतो माझा शब्दकोश वेगळा, तुझी परिभाषा वेगळी असेल. जगातील सर्व ग्रंथ मला नाथ म्हणतात आणि निर्ग्रंथ मुनी असून मला अनाथ म्हणतो आहेस असे का ?''

योगी म्हणाला, ''राजन्, संपत्तीच्या जोरावर तु स्वत:ला स्वामी समजतो आहेस. ज्या भोगाचे ऐश्वर्याचे तू मला आमंत्रण देऊ इच्छितोस ते मी स्वच्छेने सोडून आलो आहे.''

**हीच माझी अनाथता :-**

''ऐक राजा, काय आहे माझी अनाथता.. मी सुध्दा श्रीमंत बापाचा मुलगा आहे मला दोन भाऊ व एक बहीण आहे वात्सल्य बरसवणारी आई आहे. माझ्यासाठी प्राण अर्पण करणारी पत्नी आहे सर्व सुखे माझ्या चरणी लोळण घेत होती.

एकदा माझ्या डोळ्यात भयानक वेदना सुरू झाली. वैद्य आले, तांत्रिक-मांत्रिक झाले चिकित्सक येऊन गेले. पण वेदना थांबेना. माझ्या पित्याने जाहीरही केले, ''माझ्या मुलाला वेदनामुक्त करणाऱ्याला मागाल तेवढे बक्षीस दिले जाईल.'' माझे भाऊ माझ्यासाठी व्याकूळ झाले होते. माझी बहीण माझ्यासाठी तळमळत होती. माझ्या पत्नीने रडून रडून माझी छाती ओली केली होती. माझ्या आईचे वात्सल्य, पित्याची करूणा माझे दु:ख दूर करू शकले नाही हीच माझी अनाथता होती. राजा, शरीर मर्मसंधीस्थानात क्रोधाविष्ट शत्रुने धारदार शस्त्र जोराने खुपसावे, अशी भयंकर वेदना शरीरात होत होती सर्व अवयवांमध्ये ताप, डोळ्यात आग व झोपेचा पत्ता नाही.

शेवटी त्रस्त होऊन मी एका रात्री चिंतन करता करता संकल्प केला, ''कदाचित नव्हे तर निश्चितच मी कोणाला तरी दु:ख दिलेले आहे, तप्त केलेले आहे. मी एखाद्याच्या नंदनवनात आग लावलेली आहे. ती आग, ते दु:ख घनीभूत होऊनच मला त्रस्त करीत आहे. पण जर का मला या दु:खातून, वेदनेतून मुक्तता मिळाली तर जीवनात पुन्हा कोणालाही दु:ख न देण्या हेतू संयमाचा स्वीकार करेन, मी क्षमासागर बनेन.''

खंतो, दंतो निरारंभो

खंतो- स्वत:ला सक्षम बनवेन दंतो- स्वत:ला स्वामी बनवेन, निरारंभो- दुसऱ्याला दु:ख देणार नाही. या संकल्पाबरोबर अंतर्मनातील शक्ती जागृत झाली. भूतकाळातील सर्व दुखाचा संबंध तुटला. वर्तमान काळातील सर्व दु:खी लोकांविषयी करूणा निर्माण झाली. भविष्यात कोणाला दु:खी करणार नाही, या त्रैकालिक संकल्पाची निर्मिती झाली.

एका संकल्पासह एक अनुभूतीसह चालू लागलो. कित्येक दिवसांपासून, महिन्यांपासून ज्या झोपेसाठी तडपडत होतो, ती झोप आली. रात्र संपली, वेदनाही संपली, दु:खाचा काळोख सरला, सुखाचा प्रकाश झाला व त्याच क्षणी राजन् मला जाणवले माझा प्रभू मीच होऊ शकतो. माझ्या दु:खाला मीच दूर करू शकतो.

दूसरी कोणी व्यक्ती, वस्तू माझे दु:ख दूर करण्यास समर्थ नाही. श्रोतेहो, या अतिंद्रिय सत्तेविषयी जेव्हा अंतरंगात अहोभाव, आत्मभाव उत्पन्न होतो, तेव्हा धर्माचा जन्म होतो, परमात्म्याची अनुभूती येते.

या शरीराच्या वर चैतन्य आहे, इंद्रियांच्या वर अतींद्रिय आहे, मनाच्या वर माझा आत्मा आहे व तोअकल्पनीय सामर्थ्याने संपन्न आहे. त्याच्याशी जोडला गेलेला दीन दुबळा बनत नाही, दु:खाला व मृत्यूलाही शरण जात नाही या परम सत्याला स्वीकार करणारा धर्मात्मा बनतो. योगी राजाला सांगत होता रात्र संपली, वेदना संपली, दु:ख गेले मी माझ्या संकल्पाप्रमाणे स्वत:ला जिनशासनाला समर्पित केले.

**राजाला श्रेणीकला स्वदू:खाचे स्मरण**

राजा तन्मय होऊन योगीचे कथन ऐकत होता ऐकून त्याला त्याच्या जीवनातील दु:खाचे स्मरण झाले. सर्व दु:ख चलत्‌चित्राप्रमाणे दृष्टीपटलावर दिसू लागले. ती पीडा आठवली राणीने गर्भावस्थेत माझे काळीज खाण्याची इच्छा केली होती. अभयकुमाराच्या अभिनयाद्वारा राणीला खोटे काळीज खाऊ घातले.. माझ्या शरीरातील काळीज राखले पण मन दु:खाने मारले की अरे ! माझाच वंश... ज्याच्यावर मी जीवापाड प्रेम करतो, त्याला स्वप्नातही दु:ख दिले नाही तो जन्मास येण्यापुर्वीच माझ्या मृत्यूची इच्छा बाळगतो. कोण वाचवेल मला ? श्रेणिकला आपला वनवास आठवला...

पात्रता असून योग्यता असून प्रत्येक स्पर्धेत यशस्वी होऊनही राजा प्रसेनजीतने हाकलून लावले होते. प्रत्येक कसोटीत समर्थ असूनही हद्दपार केले गेले. प्रत्येक कसोटीत समर्थ असूनही असमर्थ झालो. पिता असूनही अनाथ झालो.. पात्रता असूनही शिक्षा भोगली..

श्रेणीक राजा स्वत:च्या दु:खाच्या भावधारेत वाहत होता. दु:खी माणसाची स्थिती दु:खी माणूसच जाणतो. मुनींना राजाचे दु:ख जाणवले. श्रेणीक राजाची मुनींच्या वास्तव्याशी झालेल्या सहमतीची अनुभूती मुनींना झाली व ते बोलू लागले, ''राजन् संसाराच्या दु:खामुळे संतप्त होणे ही पण एक अनाथता आहे. धर्ममार्गावर येऊनही भित्रेपणा असणे, शिथिलता बाळगणे ही एक भयानक अनाथता आहे. जिनेश्वराचा धर्म मिळूनही इतरत्र भटकत राहणे हे बेवारसपणाचे लक्षण आहे.''

इमाहू अन्ना विअणा ह्या निवा ! तमेगच्चित्तो निहुओ सुनेहीं

नियंठधम्मं लहियाण वी जहा, सीयंती एगे बहु कायरा नरा ।

ज्याच्याजवळ रक्षाकवच नाही त्यांचे शत्रुला घाबरणे समजू शकतो. पण ज्यांच्याजवळ रक्षाकवच आहे, बुलेटप्रुफच्या कक्षेत आहे त्याने शत्रुला घाबरणे, आशंकित राहणे याहून मोठा भित्रेपणा नाही. जिनेश्वराच्या कृपाछत्राखाली असणारा सिध्दीवीर आशंकित व्हावा हा भित्रेपणा भयावह आहे.

योगी बोलत होते. ''राजन् त्या परमक्षणी मला अशी अनुभूती झाली की माझा आत्मा नरकातील वैतरणी नदी पण आहे आणि पृथ्वीवरील पावन गंगा पण आहे. माझा आत्माच नरकातील दु:खदायी कूट शाल्मली वृक्ष आहे, माझा आत्माच नंदनवन होऊ शकतो. माझा आत्माच कामधेनू होऊ शकतो. मीच माझा सुखकर्ता, मीच माझा दु:खकर्ता, मीच माझा कर्ता-करवीता आहे कोणतेही कर्म किंवा व्यक्ती मला सुखी किंवा दु:खी करू शकत नाही. मी सुखी आहे तो माझ्यामुळेच व दु:खी आहे ते पण माझ्यामुळेच. अप्पा मित्तममित्तं च - शुभ भावनेत राहणारा आत्माच माझा मित्र आहे. परमात्म्याच्या मार्गावर प्रविष्ट झालो तर आत्मा मित्र आहे व परमात्म्याच्या मार्गापासून भ्रष्ट झालो तर माझा आत्माच माझा शत्रू आहे.

हे परम तत्व-सत्त्व अनाथी मुनींना राजाच्या मनात रूजवले.

**धर्म मार्गावरील भयानक अनाथता**

याच्याही पुढे मुनी राजाला जीवनातील भयानक अनाथीपणाचे दर्शन घडवू पहात आहे. 'राजन् लक्षपूर्वक ऐक, जाणीवपूर्वक जाणून घे. काही व्यक्ति संयमाचा वेश धारण तर करतात, बाह्याचरण ही करतात पण त्यांचे चरित्र संयमाचे नसते. ते साधुंची साधने तर ग्रहण करतात, पण साधना करू नाही शकत, त्यांच्या अंतरंगातील करूणेचा सागर जागृत होत नाही. क्रिया साधूची असते परंतु अंतरंगात साधुत्व नसते.''

बंधूंनो, मग यांना ओळखायचे कसे ? त्यांच्यात फरक कसा ओळखायचा ? जो दिसतो तो काचेचा तुकडा आहे की हीरा आहे कसे ओळखावे ? ज्यादा वेश संयमाचा व चरित्र ही संयमाचे तो हीरा आहे, व जाणकार असे हिरे तात्काळ ओळखतात.

विसं तु पीयं जह कालकूडं, हणाइ सत्थं जह कुग्गहीयं
एसोऽवि धम्मो विस ओववन्नो,
हणाइ वेयाल इवा विवन्नो ।।

कालकूट विष हे शीघ्र विष जसे जिभेवर ठेवताक्षणी व्यक्ती मृत्यू पावतो. आणि एखाद्याने अमृत समजून हे विष - पान केले तर तो स्वत:चा विनाशच करतो. एखाद्याच्या हातात समजा एखादे शक्तीशाली शस्त्र - अस्त्र असेल पण त्याला ते चालविण्याची अक्कल नसेल व चुकून त्याने त्या शस्त्राचे तोंड स्वत:कडे केले तर स्वत:चे नुकसान करतो.

असंच जेव्हा कोणी धर्माबरोबर धनसंपत्तीला, सत्तेला, विषयसुखाला, सुविधेला किंवा विलासी जीवनचर्चेला जोडत असेल तर धर्माला कालकुट विष बनवतात, शस्त्र उलटे पकडतात. पाखंडी लोक धर्माचा उपयोग सत्ता-साधन सुविधा मिळविण्यासाठी करतात. त्या साधन सुविधा तर त्यांना मिळतात पण त्यांचा धर्म भ्रष्ट होतो.

वर्षानुवर्षे आपण पाहात आलो आहोत की धर्माच्या नावाने लोग भांडतात. परंतु भांडणामागचे कारण हे धर्म नसते तर धार्मिक स्थळी वापरली जाणारी सत्ता व संपत्ती हे भांडणाचे कारण असते. ते धर्माला विष बनवतात. लक्षणशास्त्र, निमित्तशास्त्र, कोतूहलशास्त्र स्वप्नशास्त्र यांचा उपयोग करून लोकांना भोंदू बनवतात. आस्था, कमजोर बनवतात. मुनि म्हणतात, ''शत्रु जेवढे आपला नुकसान करीत नाही तेवढे नुकसान आपली आत्मा जेव्हा दुष्ट बनते तेव्हा होते. दुसरा कोणताही गुरू तुमचे तेवढे भले करू शकत नाही. जेवढे तुमची आत्मा तुमचे भले करू शकते तेव्हा तुमची आत्मा कामधेनु बनते.''

**राजसिंहाचे अणगार सिंहाला वंदन :-**

अनाथी मुनींच्या दिव्य वाणीने, सत्याच्या दर्शनाने प्रभावीत होऊन राजा उभा राहिला व त्याने योगीला वंदन, नमन केले, राजाच्या या वंदनेला खूप छान वाक्य आहे. या अध्यायात एक राजसिंह एका अणगार सिंहाला वंदन करीत आहे. राजाने सुरवातीलाही वंदन केले होते पण ते कुतूहलाचे होते व आता केलेले वंदन हे समर्पणाचे होते, श्रध्देचे होते, आस्थेचे होते, राजा म्हणतो, ''हे योगिराज, आपण सर्व विश्वाचे नाथ आहात, मी आज्ञानाने तुम्हाला भोगाचे आमंत्रण दिले मी प्रश्न विचारून आपल्या साधनेत बाधा आणली त्याबद्दल क्षमा करा. हे योगिराज, जे सत्याच्या जिनेश्वराच्या मार्गावर ठाम असतात तेच या जगाचे नाथ बनतात.'' श्रेणिक म्हणतो, ''आपणच माझेही नाथ आहात मला अनुशासन करा. माझ्या अपराधाला क्षमा करा.'' श्रध्दा व आस्थेने योगीला प्रदक्षिणा करून राजा श्रेणिक सत्याच्या, धर्माच्या मार्गावर चालू लागला, भगवत् सत्ता प्राप्त केली परमसत्तेशी संबंध प्रस्थापित करून परम आनंदाच्या दिशेने निघून गेला. ●

# डोंगरा एवढा माणूस, आभाळा इतके कर्तृत्व, सागरा एवढे दातृत्व !!!
# .....ऐसा 'रसिक' 'लाल' पुन्हा होणे नाही !

**लेखक : राजेंद्र बाठिया, पुणे**



रसिकलाल माणिकचंद धारीवाल... एकेकाळी सायकलवर विडी विकणारा हा माणूस अब्जाधीश रूपयांची उलाढाल असलेल्या उद्योगसमूह उभारेल, हजारो हातांना काम देईल, गरिबांच्या कल्याणासाठी सढळ हाताने कोट्यावधी रूपयांच्या देणग्या देऊन त्यांचे जीवनमान उंचावेल, असे भविष्य सत्तर वर्षापुर्वी कुणी सांगितले असते तर कदाचित त्यावर कुणी विश्वासही ठेवला नसता. पण होय, हे घडले आहे.. रसिकलाल धारीवाल या अवलिया माणसाची बुद्धीमत्ता, जिद्द आणि चिकाटीने हे घडले आहे. शिरूरच्या या सुपुत्राने केवळ महाराष्ट्र किंवा देशातच नव्हे तर परदेशातही आपल्या व्यवसायाची पताका फडकविली. व्यवसाय, समाजकारण, राजकारण, शिक्षण आदी विविध क्षेत्रांत त्यांनी अक्षरश: 'न भूतो न भविष्यति' असे काम केले. त्यामुळे केवल माणिकचंद नव्हे तर रसिकलाल धारीवाल हे नावही एक ब्रॅड बनले. रसिकभाऊ धारीवाल यांनी आपल्या कर्तृत्वातून लाखो लोकांच्या मनावर अधिराज्य गाजविले.

शिरूर तालुक्यातील घोडनदी गावात रसिकभाऊंचा जन्म झाला. वयाच्या १४ व्या वर्षीच वडिलांचे छत्र हरपले. कोवळ्या वयात घराची जबाबदारी त्यांच्या खांद्यावर येऊन पडली. त्यामुळे शिक्षण सोडून व्यवसायाचा मार्ग त्यांनी स्वीकारला. सुरवातीला त्यांनी स्टेशनरीचे दुकान सुरू केले. आपल्या अंगभूत कौशल्याने ते उत्तमरित्या चालवले. मात्र, अजून मोठे काहीतरी करावे, असे त्यांना वाटत होते. आई मदनबाई यांनी त्यांना हिंमत दिली. मग त्यांनी वडिलांचा व्यवसाय पुढे नेण्याचे ठरवले आणि अपार कष्टातून अल्पावधीत यशाचे शिखर गाठले. इतर कोणताही उद्योजक, कोणताही ब्रॅंड त्यांच्याशी स्पर्धा करूच शकला नाही. कारण स्पर्धकांचा विचार करण्यापेक्षा आपले उत्पादन सर्वोत्तम कसे असेल, याला त्यांनी प्राधान्य दिले. उद्योजकाने आपला ग्राहक, आपली बाजारपेठ स्वत: तयार केली पाहिजे, असे ते म्हणत असत. सतत काहीतरी नवीन करण्याचा ध्यास, सगळ्यांना सोबत घेऊन चालण्याची वृत्ती, सचोटीने व्यवसाय करण्याची जिद्द आणि बाजारपेठेचे अचूक ज्ञान ही यशाची पंचसूत्री त्यांनी तयार केली. कंपनीतील कर्मचाऱ्यांनाही त्यांनी कुटुंबियांप्रमाणेच प्रेम दिले. आपल्या कंपनीत काम करणारा प्रत्येक कर्मचारी समाधानी असला पाहिजे, अशी त्यांची विचारधारा होती. आजच्या काळात उद्योजकांसाठी ही बाब निश्चितच अनुकरणीय आहे. याबरोबरच कर्मचाऱ्यांच्या आर्थिक प्रगतीसाठीही भाऊंनी त्यांना नेहमी प्रोत्साहन दिले. त्यांच्या अडी-अडचणीत त्यांना सर्वतोपरी मदत केली. व्यवसायात त्यांनी अनंत अडचणींचा सामना केला. मात्र, कधी हिंमत हरली नाही. प्रतिकूल परिस्थितीत व्यापारात नुकसान होत असताना परिस्थिती पालटून व्यवसाय

नफ्यात आणण्यात त्यांचा हातखंड होता. व्यवसायातील त्यांची निर्णय क्षमता अचूक होती. त्यामुळे काळ बदलला. सरकारे बदलली, कायदे बदलले, तरी कित्येक दशकं त्यांनी व्यवसायातील सर्वोच्च शिखर कायम राखलं. आज हजारो तरूणांसाठी, उद्योजकांसाठी रसिकभाऊंचा प्रवास हा पथदर्शी प्रवास बनला आहे.

**सतत नाविन्याचा ध्यास**

मळलेल्या वाटांवरून रसिकभाऊ कधीच चालले नाहीत. स्वत:चा 'राजमार्ग' तयार करण्यात त्यांना आनंद वाटत होता. आपल्या कल्पकतेला जिद्द आणि कष्टाची जोड देऊन प्रत्येक क्षेत्रात त्यांनी स्वत: नवी वाट तयार केली. माणिकचंदच्या प्रचंड यशासोबतच रसिकभाऊंनी इतर क्षेत्रात व्यवसायाचा विस्तार केला. कोकणातील पहिला औद्योगिक गॅस प्रकल्प, ऑक्सिजनयुक्त मिनरल वॉटर, अनब्रेकेबल स्विचेस अशी बहुतेक उत्पादने ही त्या क्षेत्रातील पथदर्शी उत्पादने ठरली. बांधकाम क्षेत्र, शिक्षण, पवन उर्जा याबरोबरच प्रिंटींग व्यवसाय, इलेक्ट्रिक स्विचेसपासून चहा, काडेपेटी सारखी सर्वसामान्यांच्या गरजेची उत्पादनेही रसिकभाऊंनी आणली. आज जगातील सुमारे पन्नास देशांत माणिकचंद समूहाच्या व्यवसायाचा विशाल वटवृक्ष विस्तारला आहे.

**माणसं जोडणारा अवलिया**

रसिकभाऊंना एकदा भेटलेला माणूस कायमचाच त्यांचा होऊन जात असे. आपले संवादकौशल्य, बोलण्यातील गोडवा, समोरच्या व्यक्तिला आदर देण्याचा स्वभाव या जोरावर त्यांनी लाखो-करोडो माणसं जोडली. त्यांचा जनसंपर्क दांडगा होता. असंख्य लोकांशी त्यांचा परिचय होता. त्यांच्या संपर्कात आलेल्या प्रत्येकाला वाटायचे, भाऊ आपल्या अतिशय जवळचे आहेत. आपल्यावर त्यांचे विशेष प्रेम आहे, ही भावना लोकांच्या मनात निर्माण व्हायची. एखाद्याने सांगितलेल्या गोष्टींवर शंका आली तर ते स्वत: त्याबाबत खातरजमा करत. तसेच कुणाची चूक झाली तर त्याला ते समज देत असत. मात्र, चुकलं नसेल तर स्वत: क्षमा मागण्याचा मोठेपणा त्यांच्या अष्टपैलू व्यक्तिमत्वाचा होता.

**कुबेरा इतके दातृत्व**

रसिकभाऊंच्या व्यावसायिक यशा इतकेच त्यांचे दातृत्वही उत्तुंग होते. आपल्याकडे मदत मागण्यासाठी आलेला माणूस रिकाम्या हाती कधीच परत जायला नको. ही आई-वडीलांची शिकवण त्यांनी आयुष्यभर जपली. रसिकभाऊंकडे आलेला माणूस कधीही रिकाम्या हाती परत गेला नाही. उलट अगदी छोट्याशा गावातूनही देणगी घेण्यासाठी कुणी माणूस आला तर भाऊ त्यांची प्रेमाने विचारपूस करत. त्यांचा सन्मान करून, आदरतिथ्य करून त्याच्या अपेक्षे पेक्षा जास्तच निधी देऊन आनंदाने त्याला पाठवत असत. एखाद्या दिवशी काही दान केले नसेल तर त्यांना जेवण जात नसे. सन्माननीय रसिकलालजी धारीवाल यांनी जैन समाजाचे मुख्य तीर्थस्थळ असलेले बिहार येथील सम्मेत शिखरजी महातीर्थ, गुजरात येथील पालीताणा, शत्रुंजय महातीर्थ, शंखेश्वर पार्श्वनाथ तीर्थ, पटना येथील पावापुरी महातीर्थ, हैद्राबाद येथील कुलपाकजी तीर्थ नुकतेच प्रतिष्ठीत झालेले राजस्थान येथील जीरावाला पार्श्वनाथ महातीर्थ, मध्यप्रदेशातील अनेक तीर्थस्थळे देशभरातील अनेक तीर्थांमध्ये जीर्णोध्दार तसेच तीर्थविकासा मध्ये भरीव देणगी देऊन भक्तांच्या सोयी सुविधांमध्ये सुलभता आणली. काश्मीरपासून कन्याकुमारी पर्यंत सर्व प्रांतातील जैन स्थानके, मंदिरे, असो वा इतर धर्मीयांची प्रार्थनास्थळे, सर्व जातीधर्माच्या लोकांसाठी त्यांनी सढळ हाताने मदत केली. जैन धर्माप्रमाणे इतर धर्मांचाही ते आदर करत असत. आळंदी येथे १२ कोटी रूपये खर्चून वारकऱ्यांसाठी, दर्शनाला येणाऱ्या भक्तांसाठी निवासाची सोय केली. हॉस्पिटल, धर्मशाळा, होस्टेल, शाळा, महाविद्यालये, गोशाळा, अन्नदान, वृद्धाश्रम, अनाथाश्रम अशा सर्व ठिकाणी त्यांनी मोलाची मदत केली. माणिकचंद धारिवाल फाऊंडेशनच्या माध्यमातून त्यांनी

समाजातील विविध वंचित घटकांसाठी केलेले कार्य अनमोल आहे. रूग्णसेवा हीच ईश्वरसेवा असे म्हटले जाते. धारीवाल फाऊंडेशनच्या मदतीच्या पाठबळावर शिरूर, नाशिक, राजस्थान इथे हॉस्पिटल्स उभी राहिली आहेत. याबरोबरच रूबी हॉल, पूना हॉस्पिटल, ताराचंद रूग्णालय यासह अनेक हॉस्पिटलना त्यांनी भरभक्कम निधी देऊन रूग्णांना अद्ययावत सुविधा देण्यास सक्षम केले.

स्वत: शिक्षण पूर्ण न करता आल्याची खंत रसिकभाऊंना होती. ही परिस्थिती कोणत्याही विद्यार्थ्यावर येऊ नये, म्हणून त्यांनी विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती देण्यास सुरवात केली. सर्व जाती-धर्माच्या गुणवंत आणि गरजू-गरीब विद्यार्थ्यांना फाऊंडेशनच्या वतीने दरवर्षी तब्बल एक कोटी रूपयांच्या शिष्यवृत्ती दिल्या जातात. पुण्यासह केवळ  महाराष्ट्रात नव्हे तर राजस्थान, गुजरात, मध्य प्रदेश, उत्तर प्रदेश या राज्यांमध्येही शाळांसाठी देणग्या देण्यात आल्या.

जैन समाजातील जास्तीत जास्त मुले-मुली IAS/IPS/IFS/IRS व इ. स्टेट लेव्हल ऑफीसर होण्यासाठी जीतो तर्फे JATF - Jito Administrative Training सुरु करण्यात श्री. रसिकशेठ धारीवाल यांची प्रमुख भूमिका होती. जैन समाज अल्पसंख्यक समुदाय आहे. राजकारणात जैन धर्माला जास्त स्थान मिळणे अवघड आहे त्यामुळे प्रशासकीय कामात जास्तीत जास्त जैन बांधव यावे यासाठी ते आग्रही होते. कोणत्याही ठिकाणी नैसर्गिक आपत्तीची घटना घडली की धारीवाल फाऊंडेशनचा मदतीचा हात पुढे असतो. कच्छ आणि लातूरच्या भूकंपाच्या वेळी मदतीसाठी तेथे पोहोचला पहिला खासगी समूह हा धारीवाल समूह होता. दुष्काळात अनेक गोशाळा, दुष्काळी कॅम्पना निधीसह चारा-पाणी पोचविण्याचे काम फाऊंडेशनने केले. इतर संस्थानाही याकामी सहभागी करून मदतीचा परीघ वाढविला. दरवर्षी जैन समाजाच्या चातुर्मासात गुरूंच्या दर्शनाला येणाऱ्यांची भोजनाची व्यवस्था ते करत. अन्य उपक्रमांसाठीही ते भरभरून निधी देत. थंडीत गाडी काढून ते घराबाहेर पडत आणि रेल्वे स्टेशनवर कुडकुडत झोपलेल्या लोकांच्या अंगावर पांघरूण घालून त्यांना मायेची उब देत असत. शेकडो लोकांना त्यांनी उद्योग व्यवसाय करण्यासाठी मदतीचा हात दिला. मोतीबिंदूसह वेगवेगळ्या शस्त्रक्रिया करण्यासाठी त्यांनी हजारो रूग्णांना मदत केली.

संपत्ती अनेक जण कमवितात. मात्र, इतरांसाठी, समाजातील वंचितांसाठी इतक्या मोठ्या प्रमाणात मदत करणारे रसिकभाऊं सारखे लोक दुर्मिळच. जितके त्यांनी कमविलेतितके त्यांनी लोकांसाठी दिले. लक्ष्मीही दान केल्याने वाढत जाते. हे त्यांनी सार्थ ठरविले. त्यांची आभाळाएवढी दानशूर वृत्ती पाहून त्यांना जैन समाजाकडून 'भामाशाह' हा सर्वोच्च सन्मान देण्यात आला होता.

**मला भेटलेले रसिकभाऊ**

जैन युवक महासंघाच्या राष्ट्रीय अधिवेशनासाठी काही कार्यकर्त्यांसह मी ट्रेनने अहमदबादला निघालो होतो. आम्ही २५-३० जण द्वितीय श्रेणीच्या डब्ब्या मध्ये होतो. याच कार्यक्रमासाठी रसिकभाऊ प्रमुख अतिथी म्हणून जाणार होते. पण विमाना ऐवजी त्यांनी त्या वेळी रेल्वेच्या वातानुकूलीत डब्याचे तिकीट बुक केले. रसिकभाऊ आणि शोभाजी वातानुकूलित डब्यातून प्रवास करीत होते. रसिकभाऊ आमच्या डब्यामध्ये येऊन आमच्या सोबत बसले. इतकेच नव्हे तर आम्हा सर्वांसाठी त्यांनी पुण्याहून विशेष भोजनाची व्यवस्था केली होती. आमच्याबरोबर जेवण करत त्यांनी आयुष्यातील अनेक आठवणी, किस्से आमच्याशी शेअर केले. थेट अहमदाबादेपर्यंत आमच्या गप्पा रंगल्या. इतक्या मोठ्या माणसाने आमच्यात येऊन बसणे, मस्करी करत सर्वांशी दिलखुलास बोलणे हा आमच्यासाठी सुखद धक्का होता. वयात अंतर असूनही त्यांनी एखाद्या

मित्राप्रमाणे आमच्याशी संवाद साधला. नऊ-दहा वर्षापूर्वी रसिकभाऊंशी बोलताना एक विषय निघाला. आपल्या समाजातही अशी काही कुटूंबे आहेत. ज्यांना दैनंदिन घरखर्च भागविणे अवघड जात आहे. त्यातून भाऊंना फूड बँकेची संकल्पना सुचली. अशी जी कुटुंबे आहेत, त्यांना दरमहा लागणारे धान्य देण्याची व्यवस्था करावी. असे त्यांनी सांगितले. तसेच त्यांच्या गरजा भागवून त्यांना स्वयंपूर्ण कसे करता येईल, यासाठी भाऊंनी प्रयत्न केले. त्यातून कित्येक कुटुंबे स्वयंपूर्ण होऊन समाधानी जीवन जगत आहेत. असे अनेक लोक असतात. ज्यांच्याकडे पैसा आला की ते इतरांकडे ढूंकूनही पाहत नाहीत. मात्र, रसिकभाऊ आपल्या संपत्तीचा जराही अहंकार न बाळगता माणसांमध्ये मिसळत असत. माणसांमध्ये रमणारा माणूस, प्रेम देणारं व्यक्तिमत्व म्हणून लोक त्यांच्याकडे पाहत असत. लहान-मोठा कुणीही माणूस आला तर त्या व्यक्तीला ते वेळ द्यायचे. त्यांच्याशी चर्चा करायचे त्यांचा आदर सत्कार करूनच त्यांना पाठवायचे. लोकांच्या भावना समजून घेऊन संवाद साधण्याची त्यांची कला खरोखर असामन्य अशीच होती. आयुष्याच्या अखेर पर्यंत त्यांनी हे संवादकौशल्य जपले.

**शिरूर तालूक्याशी घट्ट नाळ**

शिरूरचे नगराध्यक्ष म्हणून तब्बल १७ वर्षे रसिकभाऊंनी काम केले. अगदी नगरपालिकेकडे निधी नसला तरी स्वखर्चाने ते नगरविकासाची कामे करत असत. शिरूरच्या राजकारणावर त्यांची पकड शेवटपर्यंत कायम होती. त्यांच्यानंतर २००७ पासून त्यांचे चिरंजीव श्री. प्रकाशजी धारीवाल शिरूर नगरपालिकेत नगराध्यक्ष म्हणून कार्यरत आहेत. व्यवसायासाठी कुठेही असले तरी शिरूरशी त्यांचा कायम संपर्क असायचा. शिरूरमधील जवळपास प्रत्येक माणसाशी त्यांचा परिचय होता. तेथील लोकांचे प्रश्न सोडविण्यासाठी ते नेहमीच तत्पर असत. १९७२ च्या दुष्काळात त्यांनी शिरूर तालुक्यातील सर्व महाविद्यालयीन विद्यार्थ्यांची परीक्षा फी भरली होती. शिरूरमध्ये त्यांनी उभारलेल्या मातोश्री मदनबाई माणिकचंद धारीवाल हॉस्पिटलच्या माध्यमातून हजारों रूग्णांना दिलासा मिळाला आहे. शिरूरचे आराध्य दैवत असलेल्या रामलिंग महाराजांच्या यात्रेचे आयोजन अनेक वर्षापासून त्यांनी केले.

**पर्यावरण संवर्धनासाठी भरीव कार्य**

रसिकभाऊंच्या ७५ व्या वाढदिवसानिमित्त देशभरात १ लाख झाडे लावण्यात आली होती. केवळ झाडे लावून ते थांबले नाहीत तर या झाडांचे संगोपन करण्यात आले. पवनचक्क्यांच्या माध्यमातून स्वच्छ उर्जेची निर्मिती करण्यासाठी गुजरात, राजस्थान आणि महाराष्ट्र येथे मोठे प्रकल्प उभारले. खडकवासला धरणातून दहा हजार ट्रक गाळ काढून तो शेतकऱ्यांना देण्यात आला. तर दुष्काळी भागात साखळी बंधारे बांधून देण्याचे कामही फाऊंडेशनने केले.

**कुटूंबात रमणारे रसिकभाऊ !**

इतके मोठे उद्योग साम्राज्य सांभाळणारा, सामाजिक कार्यात अग्रेसर माणूस कुटुंबाला कितपत वेळ देऊ शकत असेल, असे कोणालाही वाटेल. पण कामाच्या व्यापातही रसिकभाऊंनी कुटुंबाचा जिव्हाळा कायम जपला. कुटुंबातील प्रत्येक व्यक्तिशी त्यांचे असलेले प्रेम, वात्सल्य वाखण्याजोगे होते. जवळच्या अथवा लांबच्या नातेवाईकांचे त्यांनी संबंध जोपासले त्यांना प्रेम दिले. त्यांना संगीताची खूप आवड होती. सांगीतिक कार्यक्रमांचा आनंद घेणे आणि कलाकारांना प्रोत्साहन देणे, हा त्यांचा छंद होता.

**हिऱ्याचे आकर्षण**

रसिकभाऊ अलिशान मोटारींचे आणि हिऱ्यांचे मोठे चाहते होते. लान्सर, स्कोडा, ऑपेरा मेबॅक अशा आलिशान मोटारींचे देशातील पहिले ग्राहक म्हणजे रसिकभाऊ. कोणत्याही कंपनीची अलिशान मोटार बाजारात आली की भाऊ लगेच ती खरेदी करत असत. त्यांना

हिऱ्यांचेही मोठे आकर्षण. ते नवनवीन रंगातील हिऱ्यांचे निरीक्षण करून अचूक खरेदी करत. त्या हिऱ्यांचा अंगठीत वापर करून घालण्याची त्यांना भारी हौस.

पिढ्या न पिढ्या जातात, तेव्हा असा माणूस जन्माला येतो, जो केवळ घडवत नाही तर स्वत:च गौरवशाली इतिहास बनतो. त्याचे कार्य पुढच्या अनेक पिढ्यांना दीपस्तंभा प्रमाणे प्रेरणा देत राहतं. इतिहासाची पानं उलगडताना रसिकभाऊंचं दैदीप्यमान कार्य कायमच स्मरणात राहील. त्यांच्या कार्याचा वारसा पत्नी शोभाजी धारीवाल, मुलगा प्रकाशजी धारीवाल आणि कन्या जान्हवी धारीवाल हे समर्थपणे सांभाळत आहेत. भविष्यातही धारीवाल कुटुंबाचा समाजकार्याचा हा दीप निरंतर तेवत राहील. हे निश्चित. मात्र, तरीही रसिकभाऊंच्या जाण्याने जी पोकळी निर्माण झाली आहे, ती भरून काढणे अशक्य आहे. व्यक्ती म्हणून ते आमच्यात नसले तरी त्यांच्या गुणांच्या रूपाने ते आम्हाला सदैव प्रेरणा देत राहतील. त्यांचे कार्य काही अंशी जरी पुढे चालवू शकलो, तर ते आमचे भाग्य, असेच मी समजतो. अशा असामान्य कतृत्ववान व्यक्तिमत्त्वाला माझी विनम्र आदरांजली... •

महाराष्ट्रातील जास्तीत जास्त जैन समाजापर्यंत पोहचण्याचा सर्वांत खात्रीशीर, सर्वांत सोपा व सर्वांत स्वस्त मार्ग...

जैन जागृति

## कव्हर तपशील - डिसेंबर २०१७

❖ **आनंद चरण तीर्थ, चिचोंडी**

आचार्य सम्राट श्री आनंदऋषिजी म.सा. जन्मभूमि चिचोंडी (शिराल) जि. अहमदनगर येथे उपाध्याय प.पू.श्री प्रवीणऋषिजी म.सा. यांच्या प्रेरणेने गुरू आनंद फौंडेशन द्वारा २१ एकर जमिनीवर भव्य आनंद तीर्थ निर्माण करण्याचे कार्य चालू आहे.

आनंद तीर्थच्या प्रथम चरणचा समर्पण समारोह व द्वितीय चरण भूमि शुद्धिकरणाचा कार्यक्रम रविवार दि. १७ डिसेंबर २०१७ रोजी आयोजित केला आहे. या कार्यक्रमासाठी महाराष्ट्र प्रवर्तक श्री कुंदनऋषिजी म.सा., आनंद तीर्थाचे प्रेरक श्री प्रवीणऋषिजी म.सा. आदी ठाणा व सुमारे ५० ते ६० साधू साध्वी उपस्थित राहणार आहेत.

❖ **श्री. रसिकलालजी धारीवाल – स्वर्गवास**

पुणे, घोडनदी येथील उद्योगपती, दानवीर श्री. रसिकलालजी माणिकचंदजी धारीवाल यांचे २४ ऑक्टोबर २०१७ रोजी निधन झाले. त्यांच्या अंतयात्रा व प्रार्थना सभेत संपूर्ण भारतातून फार मोठा जनसमुदाय उपस्थित होता. त्यांच्या कार्याची माहितीसाठी या अंकात पान २१ व ३१ वर दोन लेख प्रसिद्ध केले आहेत. या महामानवास चोरडिया परिवार, जैन जागृति परिवाराची भावपूर्ण श्रध्दांजली.

❖ **श्रीमद् राजचंद्रजी १५० वी जन्मजयंती, धरमपूर**

श्रीमद् राजचंद्रजी यांची १५० वी जन्मजयंती संपूर्ण भारतात व परदेशातही भव्य कार्यक्रमात साजरी करण्यात आली. धरमपूर येथे युगपुरूष शताब्दी महोत्सव साजरा करण्यात आला. श्रीमद राजचंद्रजी यांच्या भव्य प्रतिमेवर महामस्तकाभिषेक करण्यात आला. या कार्यक्रमाची माहिती पान ८५ वर दिली आहे.

❖ **श्री. शांतीलालजी मुथ्था – मानव सेवा पुरस्कार**

शैक्षणिक व सामाजिक क्षेत्रात बहुमूल्य योगदाना

बद्दल भारतीय जैन संघटनेचे संस्थापक अध्यक्ष श्री. शांतीलालजी मुथ्था यांना १४ नोव्हेंबर रोजी राजीव गांधी मानवसेवा पुरस्कार राष्ट्रपती श्री. रामनाथ कोविंद यांच्या हस्ते नवी दिल्ली येथे भव्य कार्यक्रमात देण्यात आला.

❖ **जैन श्रावक संघ, कोथरूड – पुरस्कार**

जैन श्रावक संघ, कोथरूड यांच्या तर्फे डॉ. पूज्य अचलऋषिजी म.सा. यांचा चादर समारोह, आरोग्य शिबिर व सामाजिक कार्यकर्ते यांना पुरस्कार असा भव्य कार्यक्रम १४ आक्टोबर रोजी झाला. यावेळी उद्योगपती श्री. माणिकचंदजी दुगड यांना ''मानवरत्न'' पुरस्कार, श्री. अरूणभाई गुजराथी, डॉ. विनोद शहा, श्री. विजयकांतजी कोठारी, कोथरूड संघाचे अध्यक्ष श्री. रामलालजी शिंगवी इ. च्या हस्ते देण्यात आला.

❖ **संचेती ट्रस्ट, पुणे – पुरस्कार वितरण**

पुणे येथील स्व. इंदूमती बनसीलालजी ट्रस्ट तर्फे आदर्श माता, पिता, पुत्र पुरस्काराचे वितरण पद्‌विभूषण डॉ. कांतीलालजी संचेती, पद्मविभुषण डॉ. शां. ब. मुजुमदार, श्री. विजयकांतजी कोठारी, श्री. पोपटशेठ ओस्तवाल, ट्रस्टचे अध्यक्ष श्री. अभयजी संचेती यांच्या हस्ते देण्यात आला.

सौ. इंदुबाई झुंबरलालजी ललवाणी व सौ. कमलबाई धनराजजी श्रीश्रीमाळ यांना आदर्श माता पुरस्कार तर श्री. ओमप्रकाशजी नगराजजी रांका यांना आदर्श पिता पुरस्कार व श्री. राजेशजी नौपतलालजी साखला यांना आदर्श पुत्र पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. या कार्यक्रमाची माहिती पान ११६ वर दिली आहे.

❖ **सुर्यदत्ता ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूट, पुणे**

पुणे येथील सुर्यदत्ता ग्रुप ऑफ इन्स्टिट्युट ला शैक्षणिक व सामाजिक कार्याबद्दल अध्यक्ष प्रा. डॉ. संजयकुमार चोरडिया यांना ''आयकॉन ऑफ महाराष्ट्र'' हा पुरस्कार देऊन गौरविण्यात आले. डब्ल्युआरबी चे संचालक श्री. संजयकुमार, श्री. संजय जुमानी क्रिकेटर श्री. किरण मोरे यांच्या हस्ते डॉ. संजयकुमार चोरडिया यांनी पुरस्कार स्विकारला.

❖ **सौ. सुशिला मर्लेचा, पुणे – पुरस्कार**

पुणे येथील सामाजिक व धार्मिक कार्यात अग्रेसर श्री. विजयजी मर्लेचा (सुकांता थाळी) यांच्या पत्नी सौ. सुशिला यांना भवानी प्रतिष्ठानतर्फे ''स्त्री शक्ति जागर पुरस्कार'' देण्यात आला. माजी राष्ट्रपती प्रतिभाताई पाटील, पंडीत वसंतराव गाडगीळ, प्रतिष्ठानचे अध्यक्ष श्री. हेमंत जाधव यांच्या हस्ते पुरस्कार देण्यात आला.

❖ **पेपरमिंट – पुरस्कार**

लहान मुलींच्या रेडिमेड कापडातील प्रसिद्ध ब्रॅन्ड ''पेपरमिंट'' यांना शॉपर्स स्टॉप तर्फे The Best Kids - Wear Brand हा पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले. श्री. कमलेशजी कटारिया व श्री प्रशांत कटारिया यांनी शॉपर्स स्टॉपचे एम.डी. श्री. गोविंद श्रीखंडे यांच्या हस्ते पुरस्कार स्विकारला. गत ३ वर्षापासून हा पुरस्कार पेपरमिंटला मिळत आहे.

❖ **लोटस इव्हेन्टस्, पुणे – उद्‌घाटन**

पुणे येथील श्री. संदीपजी भटेवरा यांच्या लोटस इव्हेन्टस् अ‍ॅण्ड प्रॉडक्टस्‌चे कार्पोरेट ऑफिसचे उद्‌घाटन १२ नोव्हेंबर २०१७ रोजी पुणे येथील प्रसिद्ध सराफ श्री. ओमप्रकाशजी राका यांच्या हस्ते प्रमुख अतिथी श्री. राजेशजी साकला, श्री. विजयजी भंडारी, श्री. रविंद्रजी साकला, C.A श्री. सुभाषजी बोरा व भटेवरा परिवारांच्या उपस्थितीत करण्यात आले. यावेळी श्री. संदीपजी, सौ. प्रतिभा, चि. आदी भटेवरा यांनी सर्वांचे स्वागत केले. ●